<u>नि.दि.मु.क्र.१७/२०१४ मधील नि.७८ वरील  आदेश</u>
**<u>CNRNo.MHST16000084-2014</u>**
<u>(निवृत्ती आबाजी भिलारे वि. एकनाथ कृष्णा भिलारे वगैरे)</u>

वादीने सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.४ शंकर कृष्णा भिलारे हे मयत झाल्याने प्रतिवादी क्र.४ यांचे वारस अभिलेखावर घेणेस झालेला विलंब माफीसाठी दाखल केलेला आहे.

२. वादीचे असे म्हणणे आहे की, वादीने सदरचा दावा प्रतिवादी यांचे विरुद्ध कब्जा व निरंतर ताकीद मिळण्याकरिता दाखल केला आहे. सदर दाव्यातील प्रतिवादी क्र.४ शंकर कृष्णा भिलारे हे दिनांक २६.१०.२०२३ रोजी मयत झाले आहेत. प्रतिवादी क्र.४ यांना हिंदु वारस कायदयाप्रमाणे असणारे वारस अभिलेखावर येणे गरजेचे आहे. प्रतिवादी क्र.४ हे मयत झाले त्यावेळी वादी यांना त्यांच्या वारसांची माहीती नव्हती. वादी यांचे वय झाले आहे. वादीला प्रतिवादी क्र.४ चा मृत्युचा दाखल मिळण्यास उशीर झाला त्यामुळे वादीला नेमले तारखेस न्यायालयात हजर राहून प्रतिवादी क्र.४ चे वारस रेकॉर्डवर घेता आले नाहीत. याशिवाय वादी यांना त्यांचे कौटुंबिक अडचणींमुळे, घरगुती समस्यांमुळे, त्यांचे आजारपणामुळे व इतर शारिरिक व्याधींमुळे प्रतिवादी क्र.४ चे वारस न्यायालयात हजर राहुन मुदतीत रेकॉर्डवर घेता आले नाहीत. वादीला वारस रेकॉर्डवर घेण्यास विलंब झाला आहे. सदरचा विलंब विनाकारण केलेला नाही. प्रतिवादी क्र.४ चे वारस अभिलेखावर घेतले गेले नाहीत तर वादीचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. त्याकरिता झालेल्या विलंबाची माफी होवून मिळणे आवश्यक आहे. वादी यांचे निष्काळजीपणामुळे अगर बेफिकीरपणामुळे उशीर झाला नाही तर वरील अडचणींमुळे वादीला उशीर झाला आहे. दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादी क्र.४ चे वारस रेकॉर्डवर येणे जरुरीचे आहे. वादी व प्रतिवादी यांच्यातील वाद कायमस्वरुपी संपुष्टात येण्याकरिता विलंबाची माफी होवुन प्रतिवादी क्र.४ चे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ होवुन मिळावा अशी विनंती वादीने केली आहे.

३. प्रतिवादींनी सदर अर्जावर नि.८४ वर म्हणणे दाखल केले असून अर्जातील कथने अमान्य केली आहेत. त्यांनी असे कथन केले आहे की, वादीने अर्जामध्ये प्रतिवादी क्र.४ चे वारस रेकॉर्डवर घेण्यास व झालेल्या विलंबाबाबत तसेच अबेटमेंटबाबत जी कारणे दिली आहेत ती पुर्णपणे खोटी आहेत. प्रतिवादीना सुमारे ६ महिने पेक्षा जास्त काळ मयत होवून झाला आहे. वादी हे लोहारे गावातीलच राहवाशी असुन प्रतिवादी क्र.४ हा मयत असल्याची माहीती त्यांना आहे. अर्जात नमुद केलेला मजकुर चुकीचा आहे. दाव्याचे कामी वादी यांचा संपुर्ण पुरावा झालेला आहे व असे असतानाही जाणीवपुर्वक प्रतिवादी क्र.४ चे वारस मुदतीत रेकॉर्डवर न घेतल्याने तसेच त्यांनी कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल न केल्याने वादीचा निशाणी ७६, ७८ व ८० वरील अर्ज न्यायाच्या दृष्टीने रद्द बातल करण्यात यावेत अशी विनंती केली आहे.

४. वादीचा अर्ज, प्रतिवादींचे म्हणणे तसेच अभिलेखाचे अवलोकन केले. वादीने सदरचा दावा निरंतर ताकीद मिळण्याकरिता दाखल केला आहे. दाव्याचे कामकाज चालू असताना प्रतिवादी क्र.४ हे मयत झाले आहेत. तसेच वादीला प्रतिवादी क्र.४ चे वारसांविरुध्द दावा चालविण्याचा अधिकार आहे. वादीने

प्रतिवादी क्र.४ मयत असल्याबाबत निशाणी ७५ वर मृत्युचा दाखला दाखल केला आहे. सदर दाखल्यावरुन असे दिसुन येते की प्रतिवादी क्र.४ हे दिनांक २६.१०.२०२३ रोजी मयत झाले आहेत. दाव्याचे स्वरुप विचारात घेता, तसेच दाव्याचा निकाल गुणदोषावर होण्याकरीता मयताचे वारसांना अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. परंतू, प्रतिवादी क्र.४ हे दिनांक २६.१०.२०२३ रोजी मयत झाले आहेत व वादीने सदरचा अर्ज ०४.०४.२०२४ रोजी दाखल केला आहे. वादीला प्रतिवादी क्र.४ चे वारस रेकॉर्डवर घेण्याकरिता मुदतीचा कालावधी वगळता २ महिने ९ दिवसांचा उशीर झाला आहे. त्यामुळे दाव्याचे कामकाज लांबणीवर पडलेले आहे. करीता, वादीचा अर्ज त्यांचेवर र.रु.५००/- खर्च लादुन मंजुर करणे योग्य होईल. सबब खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येतो. खर्चाची रक्कम रुपये ५००/- प्रतिवादींना देण्यात यावी.

२. रक्कम रुपये ५००/- वादीने प्रतिवादीस अदा केल्यानंतर वारस अभिलेखावर घेणेस झालेला विलंब माफ करणेत यावा.

ठिकाण - वाई.
दिनांक - १६.०७.२०२४

(सी. व्ही. शिरसाट)
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर वाई.